# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/03/2023 (मंगळवार) दुपार

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

१) पो.स्टे. सावनेर: — दिनांक २६/०३/२०२३ चे सकाळी ११/०० वा. दरम्यान पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ७ महिने हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा बंडु कोकाटे ब. नं. ४३७ सपोनि नागवे मो. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल : — दिनांक २६/०३/२०२३ चे १०/०० वा. ते १७/०० वा दरम्यान पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी व फिर्यादीची पत्नी हे कामावर गेले असता फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ही घरी एकटीच हजर होती कामावरून परत येवुन पाहीले असता ती घरी दिसली नाही. आजुबाजुला तसेच नातेवाईकांकडे विचारपुस केली असता मिळून आली नाही यातील फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतून कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जवाहर चव्हाण पो स्टे काटोल मो. नं ९०६७९६७१८१ हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील राज कमल चौक सावनेर येथे दिनांक २७/०३/२०२३ चे १६/०० वा सुमारास फिर्यादी नामे— इंद्रकुमार सुखलाल परतेती वय ३२ वर्ष रा. सौसंर जि. छिंदवाडा ह. मु. सटवा माता मंदीर ता. सावनेर जि. नागपुर याने आरोपी नामे— मेहरबान बंबोरे रा. सावनेर याच्या ठेल्यावर जावुन लिंबुचा भाव विचारला असता आरोपीने ''क्यु चकलस कर रहा हे'' असे म्हणुन शिवीगाळ करून हातभुक्याने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१५४३ हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर